# ई - पोलीस पत्रिका

दि.२४/०५/२०२३ अनु.क्र.८९

## (अमरावती शहर पोलीसांची२०२३ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशीमित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबलयुक्त व तणावमुक्त पोलीसदल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचेविरूद्धकठोरकारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीसकोठडीत गुन्हे घडू नदेणे.
- आरोपी पोलीसांचेताब्यातून पळून जाऊ नयेत.
- “सुरक्षित व सुखकर अमरावती” हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्यकरू.

## भाग-१

## नेमणुक/पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

## नेमणुक

**१.पोआअ/पशा-१/नेमणुक/आस्थापना मंडळ/१००/२०२३ अमरावती शहर दिनांक ११/०५/२०२३**

**वाचा :-** १) सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ दिनांक २५.०६.२०१४
२) सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र ११ दिनांक ०६.०४.२०१५
३) महाराष्ट्र शासन गृह विभाग, शासन परिपत्रकक्रमां न्यायाप्र ३११५/प्र.क्र. ८८/पोल-३ दि. ०१.०७.२०१५
४) आयुक्तालय स्तरावरील पोलीस आस्थापना मंडळाचे दि. ११.०५.२०२३ चे इतिवृत्त.

**-: आ दे श :-**

सन 2015 च्या महाराष्ट्र अधिनियम क्र 11 दिनांक 06.04.2015 मधील मुख्य अधिनियमाच्या (महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951) च्या कलम 22 न च्या पोटकलम (1) (क) मध्ये नमुद केलेल्या तरतुदी नुसारतसेच आयुक्तालयस्तरावरील पोलीस आस्थापना मंडळ यांना प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन अमरावती शहर या पोलीस घटकामधील पोलीसस्टेशन मध्येखालील नमुदपोलीस निरीक्षकयांची नेमणुक/बदली प्रशासकीय कारणास्तव तात्पुरत्या स्वरुपात पुढील आदेशापर्यंत त्वरीत प्रभावाने त्यांचेनावासमोर दर्शविलेल्या ठिकाणीकरण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस अधिकारी यांचे नाव | पदनाम | सध्याचे नेमणुकीचे ठिकाण | आस्थापना मंडळाचातात्पुरत्या स्वरुपात नेमणुकीबाबत निर्णय |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. नितीन अशोक मगर | पोलीस निरीक्षक | पो. स्टे. फ्रेजरपुरा, अमरावती शहर | प्रभारी अधिकारी पो. स्टे. बडनेरा, अमरावती शहर |

## प्रशिक्षण

**१.पोआअ/पशा-१/प्रशिक्षण/CPR/NDPS/५८५५/२०२३ अमरावती शहर दिनांक २२/०५/२०२३**

**संदर्भ :-** पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, म. रा. मुंबई यांचे पत्र जा. क्र. ४८६/पोअधी/दविप /म.रा. /माविवि/२०२३ दि. १२.०५.२०२३.

**विषय :-**NDPS Laws & Cyber Interdictions या विषयावर पाच दिवसाचे प्रशिक्षण सत्र CPR पुणे यांचे मार्फतीने आयोजीत करण्याबाबत.

**आदेश**

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये कळविण्यात येतेकी, **NDPS Laws & Cyber Interdictions चे प्रशिक्षण** United Office of Drug & Crime, Regional Office South Asia, New Delhi व महाराष्ट्र पोलीस

यांचेसंयुक्तविद्यमाने **C.P.R. पुणे येथे दि. 05/06/2023 ते 09/06/2023**या कालावधीमध्येआयोजित करण्यात आलेले आहे.सदरचेप्रशिक्षणाकरीता अमरावती शहर पोलीस घटकातुनखालिल नमुद पोलीसअधिकारी यांचीनिवड करण्यात येत आहे.

| अ. क्र. | अधिका-याचे नांव | पदनाम | पोलीस घटकाचे नांव | सद्याची नेमणुक | मोबाईल क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. अर्जुनठोसरे | पोलीस निरीक्षक | पोलीस आयुक्त, अमरावती शहर | गुन्हे शाखा | ८९७५७६९७१८ |
| २ | श्री. नरेशकुमार मुंढे | पोलीस उपनिरीक्षक | पोलीस आयुक्त, अमरावती शहर | गुन्हे शाखा | ९९७०५०८१६६ |

## रजा

**१.पोआअ/आस्था-५/अर्जित रजा/पो.अधि./५९८५/२०२३ अमरावती शहर दिनांक २३/०५/२०२३**

## आदेश

अमरावती शहर या पोलीस घटकातीलखालील नमुद पोलीस अधिकारी यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कालावधीत **अर्जित रजा मंजुर**करण्यात येत आहे.

| अ. क्र | पोलीस अधिकारी यांचे नाव व पदनाम | नेमणुक | रजेचा प्रकार | कालावधी |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. विजयकुमार वाकसे पोलीस निरीक्षक | राजापेठ | अर्जित रजा | दि. ०२.०६.२०२३ ते १६.०६.२०२३ पर्यंत १५ दिवस |
| ०२ | श्री. संदिप हिवाळे | नागपूरीगेट | अर्जित रजा | दि. २५.०५.२०२३ ते ०१.०६.२०२३ पर्यंत ८ दिवस |

## भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरणे

## शिक्षा

**१.पोआअ/विचौ-२/कसुरी/अंतिम आदेश/सपोउपनि-१४२४ प्रमोद पवार/५९५२/२०२३ अमरावती शहरदिनांक २३/०५/२०२३**

## आदेश

**कसुरदाराचे नाव :-** चालकसपोउपनि/ १४९४ प्रमोद भानुदास पवार, नेमणूक - मोटार परिवहन विभाग, अमरावती शहर

**थोडक्यातकसुर :-**

तुम्ही मोटार परिवहन विभाग, अमरावती शहर येथे नेमणूकीस असून, दिनांक १४/०५/२०२२ चे २०.०० वा. ते दिनांक १५/०५/२०२२ चे ०८.०० वा. पावेतो तुमची पो.स्टे. वलगांव सि.आर. मोबाईल क्रमांक एम.एच.२७/अेअे-४८१ वर रात्रपाळी डयुटीवर असतांना तुम्ही बेजबाबदार/निष्काळजीपणेसरकारी वाहन चालविल्यामुळे, वलगाव येथून

चांदूरबाजार कडे जात असणारे वाहन क्रमांक एम.एच.२७/ अे.झेड-३९५९ चे चालक यांचे ताब्यातील वाहन शासकीयवाहनास मागून धडकल्याने अपघात झाला त्यामुळे नमुद वाहन चालक बंडू किसन कांबळे यांनी दिलेल्या फिर्याद नुसार अपचारी यांचे विरुध्द पो.स्टे. वलगांव येथे अप.क्र. १५६/२०२२ कलम २७९,३३७ भादवी सहकलम १८५ मोटार वाहन कायदा प्रमाणेगुन्हा दाखलकरण्यांत आला. तुमचे विरुध्द गुन्हा नोंद होण्यापूर्वी तुमची वैद्यकीय तपासणीकेली असता तुम्ही मद्याचे अंमलाखाली असल्याचे प्रमाणपत्र वैद्यकीय अधिकारी यांनी दिले. तसेचतुमच्या रक्ताचे नमुने न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळा, अमरावती येथेतपासणीकरीता पाठविण्यात आले.

प्राथमिक चौकशी संबंधीने तुमचा जबाब नोंदविला असता तुम्ही जबाबामध्येसांगीतलेकी, दिनांक १४/०५/२०२२ चे २०.०० वा. ते दिनांक १५/०५/२०२२ चे ०८.०० वा. पावेतो तुमची डयुटी मोटर परिवहन विभाग, अमरावती येथून डायल ११२ वाहन क्रमांक एम.एच.२७/अेअे-४८१ वर पो.स्टे. वलगांव हद्दीत पेट्रोलींगकरीता नेमण्यात आलीहोती. कर्तव्यावर असतांना अंदाजे २०.४५ वा. MDT वर माहिती मिळालीकी, रेवसा फाटा येथील रेल्वे पुलावर ट्राफीक जाम झाला आहे. त्वरीत पोहचा अशा माहिती वरुन पो.स्टे. वलगांव येथील पो.कॉ. शैलेष बेदरकर ब.नं. १८६७ सह रेवसा फाटा रेल्वे पुलाजवळ जावून पाहणीकेलीत्याठिकाणी पुलावरुन ट्राफीक जाम झाल्याचे दिसले म्हणूनतुम्हीगाडीचासायरन वाजवित पुलावरील वाहतूक सुरळीतकेली. व वलगांवच्या दिशेने वाहतूक सुरळीतकरीत निघाले. तुम्ही जुना बसस्टॉप कडून जात असतांना समोरुन येणाऱ्या वाहनाचे लाईटाचा लख्ख प्रकाशतुमच्या डोळयावर आला. त्यामुळेतुमचा रस्त्याचा अंदाज चुकला व रोड डिव्हायडर दिसून आले नाही. त्यामुळे वाहनाचा उजवे बाजूचा चाक डिव्हायडरला धडकले त्याचवेळी मागून येणारा दुचाकी वाहन चालक वेगात आल्यामुळे दुचाकी अनियंत्रीत होवून शासकीय वाहनावर मागून आदळले. त्यामुळे घटनास्थळी बरेच लोकांचीगर्दी जमली. म्हणून पोकॉ. शैलेष बेदरकर ब.नं. १८६७ यांनी डिओ निवासराव घुगे ब.नं. ७०६ यांना मोबाईल फोनव्दारे अपघाताबाबत माहिती दिली. काही वेळातच डिओ घटनास्थळी आले. परंतू लोकांचीगर्दी जास्त असल्यानेत्यांनी पो.नि. विजयकुमार वाकसे सा. यांना मोबाईलव्दारे माहिती दिलीत्यानंतर पो.नि. पो.स्टे. वलगांव हेस्टॉफसह घटनास्थळी आलेत्यांनीस्टाफचे मदतीने लोकांचीगर्दी हटवून अपघातग्रस्त वाहन पो.स्टे. ला आणले. त्यानंतरतुमची विचारपूस केली व तुम्हाला जिल्हा सामान्य रुग्णालय येथे वैद्यकीय चाचणीकरीता घेवून गेले. त्यावेळी तुम्ही दारु पिले आहे किंवा कसे याबाबत चाचणी करुन रक्ताचे नमुने घेण्यात आले. जिल्हा सामान्य रुग्णालय येथील वैद्यकीय अधिकारी यांनीतुमची दारु बाबत केलेल्या चाचणी अहवालावरुन व दुचाकी चालक यांनी पो.स्टे. वलगांव येथे दिलेल्या फिर्याद वरुन तुमचे विरुध्द अप.क्र. १५६/२०२२ कलम २७९,३३७ भादवी सहकलम १८५ मोवाका प्रमाणेगुन्हा दाखलकरण्यांत आला आहे. तुम्ही पोलीस विभागात अत्यंत जबाबदार पदावर कामकरीत असूनतुमची वर्तणूक अत्यंत बेजबाबदार व बेशिस्तपणाची आहे. तुम्ही शासकीय कर्तव्य पार पाडीत असतांना अत्यंत निष्काळजीपणे वाहन चालविल्याने सदरचा अपघात घडला आहे.

उपरोक्तकसुरी प्रकरणीसपोउपनि/१४९४ प्रमोद भानूदास पवार, नेमणूक मोटर परिवहन विभाग, अमरावती शहर यांना मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (५) चेतरतूदी नूसार**देय वार्षीक वेतनवाढ २ (दोन) वर्षाकरिता (अपरिणामकारक) का रोखण्यांत येवू नये ?** म्हणूनकारणे दाखवा नोटीस देण्यांतआली. सदर नोटीसतुम्ही दिनांक २४/११/२०२२ रोजी स्विकारुन त्यावर आपलेस्पष्टीकरणसादरकेले. तत्पुर्वी तुम्हास दिनांक २५/०४/२०२३ रोजी मा. पोलीस आयुक्त यांचे आज्ञांकितकक्षेतसमक्ष बोलविण्यात येवून तुमचे म्हणणे ऐकूण घेण्यात आले असता तेसमाधानकारक दिसून आले नाहीपरंतु आपणास पुढील कर्तव्यात सुधारण्याची एकसंधी देण्यात येत असुनकारणे दाखवा नोटीस मध्ये देण्यात आलेल्या प्रस्तावित शिक्षेमध्ये अंशत: बदल करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमीतकरण्यांत येत आहे.

## <u>अंतिम आदेश</u>

उपरोक्तकसुरी प्रकरणीसपोउपनि/१४९४, प्रमोद भानूदास पवार, नेमणूक मोटर परिवहन विभाग, अमरावती शहर यांना मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ पोटनियम (२) मधील (४) च्या तरतुदी नुसार**रु. १,०००/-**

**आर्थिक दंडाच्या** शिक्षेबाबतचे अंतीम आदेश निर्गमीतकरण्यांत येत आहे शिक्षेबाबतचे अंतीम आदेश निर्गमीतकरण्यांत येत आहे.

उपरोक्त शिक्षेनेकसुरदार व्यथित होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचेतारखेपासुन ६० दिवसाच्या आत मा. अपर मुख्य सचिव, गृहविभाग, मंत्रालय, मुंबई यांना यथायोग्य मार्फतीने अपिल अर्ज सादर करु शकता.

## भाग-३

## वेतन/वेतन संरचना/वेतन निश्चितीती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

## संकीर्ण

### १.पोआअ/लेखा/घबाअ-व्याज वसुली/५६४/२०२३ अमरावती शहरदिनांक १५/०५/२०२३

**संदर्भ :-** शानि.वित्त विभाग क्र.घबाअ-२०१२/प्र.क्र.३०/२०१२/विनियम दि.२०.०२.२०१५

**विषय :-** घर बांधणी अग्रीमावरील व्याज वसुलीबाबत.

---oooo---

उपरोकत संदर्भाकित विषयान्वये खालीलप्रमाणे नमूद पोलीस अधिकारी/अमलदार यांचे विनंती अर्ज या कार्यालयास प्राप्तझाले असूनत्यानुसार त्यांना मंजूरकरण्यात आलेल्या घरबांधणी अग्रीमाच्या मुददलाचीकपात पुर्णझाली असून त्यावरील व्याजाची रक्कम परिगणनाकरून वेतनातून वसुल होणेबाबत विनंती केली आहे.

| अ.क्र | पोलीस अमलदार यांचे नाव व पदनाम | घ.बा.अ वरील व्याज | कपात करावयाचे हफ्ते शा.नि.०२.०२.२०२१ | कपात सुरु करावयाचा महिना |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ |
| १. | सहा.पोउपनि/प्रयंचा विजय गजानन आत्राम,<br>सध्या नेमणूक बिनतारी संदेश विभाग | रू. ४,९८,००७/- | १०३७५x४७<br>१०३८२x०१ | मे-२०२३ |

तरी मा.महालेखाकार यांचे आक्षेपाचेतसेच अतिरीक्त रक्कम भरण्याचे अधिन राहून वरीलप्रमाणे नमूद पोलीसअमलदार यांचेकडील शिल्लक घरबांधणी अग्रीमाचे व्याजाची परिगणनाकरण्यात आली असूनत्यांचे**माहे०५/२०२३** चे वेतनातून सदरचीकपात सुरु करावी. तथापी वरील नमूद पोलीस अमलदार सेवानिवृत्त/स्वेच्छासेवानिवृत्त/सक्तीने सेवानिवृत्त झाल्यास व व्याजाची रक्कम शिल्लक राहील्यास शानि.वित्त विभाग क्र.घबाअ-२०१२/प्र.क्र.३०/२०१२/विनियम दि.२०.०२.२०१५ व क्र. घबाअ-२०१९/प्र.क्र.१४/२०१९/विनीयम दि.०२.०२.२०२१ मधील नियम क्र. ७ (११) अन्वये व्याजाची रक्कमत्यांचे सेवानिवृत्ती उपदानातून वसुल करण्यात यावी.

### २.पोआअ/लेखा/मोसाअ व्याज/५७६४/२०२३ अमरावती शहरदिनांक १८/०५/२०२३

**संदर्भ :-** मा.पोलीस महासंचालक,म.रा.मुंबई यांचे परिपत्रकक्र.पोमसं/३१/शासकिय अग्रीम/१८५/१६
दि.०१.०२.२०१७

**विषय :-** मोटरसायकल अग्रीम व्याज कपात करणेबाबत.

---oooo---

उपरोकत संदर्भाकित विषयान्वये, पोलीस आयुक्तकार्यालय अमरावती शहर आस्थापनेवरील खालीलप्रमाणे नमूद पोलीस अंमलदार यांचे विनंती अर्ज या कार्यालयास प्राप्त झाले असुन, त्यांना मंजुरकरण्यात आलेल्या मोटरसायकल अग्रीमावरील व्याजाची कपातत्यांचे वेतनातून सुरु करणेबाबत त्यांनी विनंती केली आहे. त्यांचे वेतनपटाची पडताळणीकेली असता मोटरसायकल अग्रीमाची मुददलत्यांचे वेतनातून कपात झाली असून त्यावरील व्याजाची खालीलप्रमाणे परिगणनाकरण्यात आली आहे.

| **अ.क्र** | **पदनाम/ब.नं/नाव** | **मंजुर मो.सा.अ रक्कम** | **व्याजाची रक्कम** | **माहे ०५/२३ पासूनकपात करावयाचे हफते** |
|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** |
| 1. | पोहवा/१७७० दिपकश्रीराम धोटे, आर्थीकगुन्हे शाखा | रू. ७००००/- | रू.१३३८८/- | १३३८X०९<br>१३४६X०१ |
| 2. | पोशि/१८०७ भुषण मनोज पद्मणे, मो.प विभाग | रू ७००००/- | रू.१३३८८/- | २०००X०६<br>१३८८X०१ |
| 3. | सपोउपनि/१४० सुरेश पी.डबरे, पो.स्टे नागपूरीगेट | रू.७००००/- | रू.१३३८८/- | १३३८८X०१<br>एकरकमी वेतनातुन |

तरी वरीलप्रमाणे नमूद पोलीस अमलदार यांचे वेतनातून रकाना क्र.०५ मध्ये दर्शिविल्याप्रमाणे नियोजीतहफत्यातमोटरसायकल अग्रीम व्याजाची रक्कम**माहे ०५/२०२३** पासूनचे वेतनातून सुरु करावी.

**(किशोर शेंडे)**
प्रशासकीय अधिकारी
पोलीस आयुक्त, अमरावती शहरकरीता

प्रति,
पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस